# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**सोमवार, दिनांक २२ जुलै, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ)** तारांकित प्रश्न.

**(ब)** अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५६९ ते ५९१ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** :

**(अ)** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अलग लेखा परिक्षण अहवाल क्रमांकः रिपोर्ट/एसएआर/१०-११/एमकेव्हीडीसी/९७ दिनांक १६/०८/२०१२ चा अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक १८ जुलै, २०१३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली, परंतु राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १)**

(१) **सर्वश्री सुधाकर देशमुख,** देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापुसाहेब पठारे, कृषिभूषण साहेबराव पाटील, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री नाना शामकुळे, विजय घोडमारे, सुधीर पारवे, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, नाना पटोले, प्रा.लक्ष्मण ढोबळे, सर्वश्री प्रकाश डहाके, धनराज महाले, नवाब मलिक, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री दादाराव केचे, सुभाष झनक, किसन कथोरे, सुरेश जेथलिया, विनोद घोसाळकर, **वि.स.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात विविध भागात माहे जून, २०१३ मध्ये आलेल्या अतिवृष्टीमुळे काही जणांचा बळी जाणे, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट, समुद्रपूर; भंडारा जिल्ह्यातील पवनी, साकोली, लाखांदूर, व लाखनी; गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोर आणि सडक अर्जुनी, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, भद्रावती, चिमुर, ब्रम्हपुरी, राजुरा, कोरपना व जिवती; गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा, आरमोरी, कुरखेडा व कोरची या तालुक्यात अतिवृष्टीमुळे एकाच दिवसात पावसाने संपूर्ण महिन्याची सरासरी ओलांडणे, अतिवृष्टीमुळे नदी, नाल्यांना पूर आल्याने घरांची पडझड होऊन हजारो हेक्टर जमिनीवरील पिके नष्ट होणे, वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील अडाण प्रकल्प पूर्ण भरल्याने जलसंपदा विभागाच्या उशिराच्या निर्णयामुळे धरणाच्या वेस्ट वेअरची सर्व गेटस् एकदम उघडल्याने धरणाच्या खालील भागातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान व शेतातील पेरण्यांचे नुकसान झाले असल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची आलेली वेळ, उमरेड तालुक्यात शिरपूर येथे आमनदीवर वे.को.ली.ने बांधलेल्या पारामुळे पाणी शेतात घुसुन ४० हेक्टरमधील पिकांचे नुकसान होणे, अतिवृष्टीमुळे घरे कोसळणे, घरांची पडझड होणे, पिकांचे नुकसान झाल्याने तातडीने सर्वेक्षण करून आर्थिक नुकसानभरपाई देऊन त्यांना दुबार पेरणी करिता बी-बियाणे, खते उपलब्ध करून नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, पेरणीसाठी बँकांकडून पीक कर्ज न मिळाल्यामुळे व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हवालदिल होणे, शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी तातडीने मदत देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री प्रकाश भोईर,** सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, मंगेश सांगळे, ॲड.अशोक पवार, सर्वश्री रमेश थोरात, आर.एम.वाणी, शिशिर शिंदे, नितीन सरदेसाई, प्रविण दरेकर, बाळा नांदगांवकर, ॲड.उत्तमराव ढिकले, सर्वश्री नितीन भोसले, राजहंस सिंह, वसंत गिते, भिमराव तापकीर, गिरीष बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.संजय भेगडे, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री महादेव बाबर, अनिल कदम, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"कात्रज घाट व त्या परिसरात गत १ वर्षापासून सर्रासपणे भूमाफियांकडून जेसीबी तसेच डंपर यांचा मोठ्या प्रमाणात वापर करून बेकायदा टेकडी फोडून गौण खनिजाचे होत असलेले उत्खनन व वाहतूक, परिणामतः सातारा महामार्गावरील अतिक्रमणे, पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रणेच्या अभावामुळे दिनांक ७ जून, २०१३ रोजी आलेल्या पुरात शिंदेवाडी येथे झालेल्या दुर्घटनेत २ व्यक्तिचा झालेला मृत्यु, अनेक वाहने वाहून गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात झालेले मालमत्तेचे नुकसान, याप्रकरणी अटक केलेल्या किसन राठोड या भूमाफियाचे महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर असलेले संगनमत, त्यामुळे महसूल विभागाकडे तक्रारी करूनही त्याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, उपरोक्त दुर्घटनेनंतर राठोड याना बेकायदा बांधकाम केल्याप्रकरणी अटक करण्यात आल्यानंतर त्यानी शेकडो एकर जमिनीचे नियमबाह्य व्यवहार केल्याचे उघडकीस येणे, किसन राठोड याने हवेली, भोर तसेच वेल्हे तालुक्यातही बेकायदेशीर जमिनींचे व्यवहार केल्याचे उघडकीस येणे, तसेच हवेली तालुक्यातील रहाटवडे येथेही त्यांनी बेकायदा टेकडीफोड केल्याचे निदर्शनास येणे, ऐवढ्या मोठ्या प्रमाणावर राजरोसपणे बेकायदेशीर

टेकडीफोड होत असतानाही यासंदर्भात तक्रारी करूनही कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, या प्रकरणात जबाबदार असणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कात्रज डोंगरावर जमिनीमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचीही चौकशी करण्याची आवश्यकता, याप्रकरणी सखोल चौकशी होऊन सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात विनाविलंब ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच बेकायदेशीर टेकडीफोड प्रकारास परिणामकारकरित्या विनाविलंब आळा घालण्यासाठी आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुभाष देसाई,** विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, रविंद्र वायकर, आर.एम.वाणी, महादेव बाबर, विजय औटी**,** मधु चव्हाण, वामनराव कासावार, अमीन पटेल, योगेश सागर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबईतील चेंबुर-माहूल परिसरात असलेल्या खत कारखाना, रिफायनरी आणि वीज प्रकल्पामुळे हवा अशुध्द होऊन त्या परिसरात दमा खोकला व क्षयरोगासारख्या गंभीर आजारांची लागण होवून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असताना त्याच परिसरात टाटा वीज कंपनी कोळश्यावर आधारीत वीज प्रकल्प उभारणार असणे, प्रकल्पातून निघणाऱ्या कोळश्याच्या भुकटीमुळे आजारांमध्ये अधिक भर पडून नागरीकांचे आरोग्य गंभीर व चिंताजनक होणार असणे, या प्रकल्पाबाबत दिनांक १५ जानेवारी, २०१३ रोजी जिल्हाधिकाऱ्यांसमोर झालेल्या जनसुनावणीत अनेक आक्षेप नोंदविण्यात आलेले असणे, प्रकल्पातील कोळश्यामधून निघणारे धुळीकण ५ ते १० कि.मी. परिसरात पसरणार असून चेंबूर-माहुल पासून घाटकोपर व विक्रोळीवासियांनाही आरोग्याच्या दृष्टीने या प्रकल्पाचा धोका असणे, तसेच या प्रकल्पासाठी ६०० मॅट्रीक टन कोळसा वापरल्यानंतर होणारी राख कुठे ठेवणार वा त्याची विल्हेवाट कशी लावणार याचे उत्तर टाटा वीज कंपनी व्यवस्थापनाने दिलेले नसणे, आधीच चेंबुरचे प्रदूषण हे प्रदूषण गुणोत्तरप्रमाणे ८० अंश असायला हवे ते सद्यःस्थितीत १८०-१६०-१२० या पातळीपर्यंत वाढलेले असणे, तसेच माहुल, गव्हानपाडा, आंबापाडा, ट्रॉम्बे, मंडाला व मानखुर्द हा आजुबाजूचा परिसर कारखान्यांनी व्यापलेला असल्याने त्यातून होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे आरोग्यावर गंभीर स्वरुपाचा परिणाम होत असणे, चेंबुर-माहुल, घाटकोपर-विक्रोळी व आजुबाजूच्या परिसरातील जनसुनावणीसाठी आलेल्या नागरिकांनी सदर परिसर हा डहाणूप्रमाणेच "इकोसेन्सिटिव्ह" परिसर म्हणून घोषित करावा अशी केलेली मागणी, सदर मागणी करून ५ महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ वा टाटा वीज कंपनीने जनसुनावणीत नागरिकांनी घेतलेल्या आक्षेपाला कोणतेच उत्तर न देणे, त्यामुळे नागरिकांनी दिनांक ७ जून, २०१३ रोजी भव्य मोर्चा काढून कोळश्यावर आधारीत टाटाचा प्रस्तावित वीज प्रकल्प होऊ नये याबाबत शासनास दिलेला इशारा, शासनाने सदर वीज प्रकल्प रद्द करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही वा प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**सहा : सन २०१३ - २०१४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).**

(१) नगरविकास विभाग.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(३) नियोजन विभाग.

(४) आदिवासी विकास विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सात : शासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(२)** सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० जुलै, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.